Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-5(A)| May-2026

Original Article

# शाश्वत समाज निर्मितीमध्ये सरफोजी राजे (दुसरे) यांच्या कार्यांचे आणि प्रशासकीय धोरणांचे ऐतिहासिक अध्ययन

**अमितकुमार गणेश शिंगणे**
NET, SET (इतिहास, शिक्षणशास्त्र), संशोधक विद्यार्थी, एम.इ.एस. आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज मेहकर, जि. बुलढाणा
**ईमेल -** amitshingane156@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180512
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 5(A)
Pp. 49-53
May- 2026
**Submitted:** 15 Apr. 2026
**Revised:** 25 Apr. 2026
**Accepted:** 10 May. 2026
**Published:** 31 May 2026

***सारांश -***

*तंजावरच्या मराठा साम्राज्यातील सरफोजी राजे दुसरे यांचा कार्यकाळ इ.स. १७९८-१८३२ हा दक्षिण भारताच्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासातील एक क्रांतीकारक पर्व मानला जातो. या शोधनिबंधामध्ये सरफोजी राजांच्या प्रशासकीय कौशल्याचे आणि त्यांनी राबवलेल्या लोकोपयोगी उपक्रमांचे सूक्ष्म विश्लेषण करण्यात आले आहे. शाश्वत समाज निर्मितीसाठी आवश्यक असणारे महत्त्वाचे घटक म्हणजे पारदर्शक प्रशासन, प्रगत आरोग्य व्यवस्था, सर्वांसाठी शिक्षण, आणि ज्ञानाचे पद्धतशीर जतन; या सर्वच क्षेत्रांत त्यांचे योगदान अतुलनीय आहे. त्यांनी स्थापन केलेला धन्वंतरी महाल हा दवाखाना विविध वैद्यकीय प्रणालींच्या समन्वयाचे एक जागतिक संशोधन केंद्र होते. सरस्वती महाल ग्रंथालयाचे पुनरुज्जीवन करून त्यांनी प्राचीन हस्तलिखितांचे आणि आधुनिक ज्ञानाचे शाश्वत जतन केले. त्यांच्या नागर नियोजनामध्ये भुयारी सांडपाणी व्यवस्था आणि जलव्यवस्थापन यांसारख्या आधुनिक संकल्पनांचा समावेश होता. प्रस्तुत अभ्यासामध्ये त्यांच्या या कार्याचा संबंध आजच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांशी जोडण्यात आला आहे. त्यांची धोरणे ही तात्कालिक उपाययोजना नसून ती समाजाच्या दीर्घकालीन प्रगतीचा विचार करणारी होती. त्यांच्या या कार्यामुळे तंजावर हे ज्ञानाचे आणि संस्कृतीचे केंद्र म्हणून जागतिक नकाशावर आले, ज्याचा वारसा आजही समाजाला शाश्वत विकासाची दिशा दाखवत आहे.*

***मुख्य शब्द -****शाश्वत समाज, सरफोजी राजे दुसरे, तंजावर प्रशासन, लोकोपयोगी कार्य, धन्वंतरी महाल, सरस्वती महाल ग्रंथालय, जलव्यवस्थापन, शिक्षण धोरण, छत्रम व्यवस्था, ज्ञान संवर्धन.*

**प्रस्तावना -**

शाश्वत समाज निर्मितीचा विचार करताना समाजाचा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक स्तर उंचावणे आवश्यक असते. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी भारत एका मोठ्या राजकीय आणि सामाजिक परिवर्तनाच्या उंबरठ्यावर उभा होता. एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवातीला तंजावरच्या गादीवर बसलेल्या सरफोजी राजांनी आपल्या मर्यादित राजकीय सत्तेचा उपयोग समाजाच्या सर्वांगीण कल्याणासाठी केला. शाश्वत समाज म्हणजे असा समाज जिथे भविष्यातील गरजांशी तडजोड न करता वर्तमान गरजांची पूर्तता केली जाते. त्यांच्या प्रशासनात ही दूरदृष्टी प्रकर्षाने जाणवते. त्यांनी केवळ राज्याचा विस्तार करण्यापेक्षा राज्याच्या अंतर्गत गुणवत्तेवर आणि मानवी विकासावर अधिक भर दिला. सरफोजी राजांच्या प्रशासनाचा मुख्य गाभा उपयुक्त ज्ञान आणि मानवतावाद हा होता. त्यांनी तत्कालीन काळात तंजावरमध्ये प्रबोधनाचे एक नवीन युग सुरू केले.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. संदीप भामरे इतिहास विभाग के.टी.एच. एम. महाविद्यालय, नाशिक.*

**How to cite this article:**
*शिंगणे, अमितकुमार. गणेश. (2026). शाश्वत समाज निर्मितीमध्ये सरफोजी राजे (दुसरे) यांच्या कार्यांचे आणि प्रशासकीय धोरणांचे ऐतिहासिक अध्ययन. Journal of research & development, 18(5), 49–53. https://doi.org/10.5281/zenodo.20923306*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.20923306
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-5(A)| May-2026

त्यांच्या प्रशासकीय धोरणांमध्ये विकेंद्रीकरण, पारदर्शकता आणि लोकसहभाग यांसारख्या आधुनिक तत्त्वांचा समावेश होता. शाश्वत विकासाचा पाया हा शिक्षणावर अवलंबून असतो, हे ओळखून त्यांनी जात, धर्म, लिंग असा कोणताही भेदभाव न करता शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. विशेषतः महिला शिक्षणासाठी त्यांनी उचललेली पावले ही त्या काळाच्या खूप पुढची होती. आरोग्य क्षेत्रातील त्यांच्या संशोधनामुळे तंजावर हे वैद्यकीय पर्यटनाचे आणि संशोधनाचे केंद्र बनले होते. धन्वंतरी महालाच्या माध्यमातून त्यांनी भारतीय आणि पाश्चात्य वैद्यकशास्त्राचा जो समन्वय साधला, तो आजच्या एकात्मिक उपचार पद्धतीचा पूर्वज मानला जाऊ शकतो. तसेच, ज्ञानाचे जतन करण्यासाठी त्यांनी सरस्वती महाल ग्रंथालयाला जे स्वरूप दिले, त्यावरून त्यांची भविष्यातील पिढ्यांसाठी माहिती जतन करण्याची तळमळ दिसून येते. या शोधनिबंधाचा मुख्य उद्देश सरफोजी राजांच्या या विविध पैलूंचा अभ्यास करून त्यांच्या कार्याचा शाश्वत समाज निर्मितीतील वाटा अधोरेखित करणे हा आहे.

**उद्दिष्टे -**

१. सरफोजी राजांच्या प्रशासकीय संरचनेचा आणि त्यातील विकेंद्रीकरण धोरणांचा सविस्तर अभ्यास करणे.

२. सरफोजी राजांच्या आरोग्य क्षेत्रातील क्रांतिकारी कार्याचा आणि धन्वंतरी महालच्या संशोधन पद्धतीचे विश्लेषण करणे.

३. सरस्वती महाल ग्रंथालयाच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या ज्ञान संवर्धन आणि माहिती जतन प्रक्रियेचा आढावा घेणे.

४. सरफोजी राजांच्या सार्वजनिक पायाभूत सुविधा, विशेषतः जलव्यवस्थापन आणि नागरी स्वच्छता धोरणांचे परीक्षण करणे.

५. त्यांच्या शैक्षणिक सुधारणांमधील सर्वसमावेशकता आणि विशेषतः महिला शिक्षणाबाबतच्या भूमिकेचा शोध करणे.

६. सरफोजी राजांच्या कार्याचा आधुनिक समाजासाठी असलेला सांस्कृतिक आणि सामाजिक ठेवा अधोरेखित करणे.

**गृहितके -**

१. सरफोजी राजांची प्रशासकीय धोरणे ही केवळ सत्ता टिकवण्यासाठी नसून ती लोककल्याणकारी आणि शाश्वत राज्याच्या निर्मितीसाठी होती.

२. सरफोजी राजांचा वैज्ञानिक दृष्टिकोन आणि पारंपारिक भारतीय ज्ञान प्रणाली यांच्या समन्वयामुळे तंजावरमध्ये एक ऐतिहासिक प्रबोधन काळ अवतरला होता.

३. सरफोजी राजांनी राबवलेली जलव्यवस्थापन आणि सार्वजनिक आरोग्य धोरणे ही आधुनिक शाश्वत विकासाच्या संकल्पनेशी सुसंगत आहेत.

४. सरफोजी राजांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्यामुळे समाजातील दुर्बल घटकांना प्रगतीच्या मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळाली.

५. सरफोजी राजांचा वारसा आजही दक्षिण भारताच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीचा एक अविभाज्य भाग आहे.

**विषयाचे महत्त्व -**

आजच्या जागतिक परिस्थितीत जेव्हा आपण हवामान बदल, आरोग्य आणीबाणी आणि सामाजिक विषमतेसारख्या आव्हानांशी लढत आहोत, तेव्हा सरफोजी राजांच्या प्रशासनाचा अभ्यास करणे अत्यंत समयोचित ठरते. शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असलेली दूरदृष्टी त्यांच्या कार्यात दोनशे वर्षांपूर्वीच दिसून येते. नैसर्गिक संसाधनांचा, विशेषतः पाण्याचा वापर किती नियोजनबद्ध असावा, याचे उदाहरण त्यांनी बांधलेल्या तलाव आणि विहिरींच्या जाळयावरून मिळते. त्यांच्या कार्याचे महत्त्व ऐतिहासिक दस्तऐवाजांपुरते मर्यादित नसून ते आजच्या धोरणकर्त्यांसाठी एक मार्गदर्शक आराखडा आहे. ज्ञानाचे संवर्धन लोकांसाठी उपलब्ध करून देणे आणि त्यातून नवीन ज्ञानाची निर्मिती करणे, ही त्यांची पद्धत आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगातही आदर्श आहे. आरोग्य क्षेत्रात त्यांनी ठेवलेला रुग्ण-नोंदणीचा वारसा हा आजच्या आरोग्य माहिती प्रणालीचा पाया मानला जाऊ शकतो. म्हणून, एक शाश्वत आणि प्रगतिशील समाज घडवण्यासाठी सरफोजी राजांच्या धोरणांचा अभ्यास करणे ही काळाची गरज आहे.

**विषय विवेचन -**

शाश्वत समाजाची संकल्पना ही नैसर्गिक संसाधनांच्या बचतीपुरती मर्यादित नसून ती मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारी एक व्यापक व्यवस्था आहे. तंजावरचे सरफोजी राजे भोसले (दुसरे) यांच्या प्रशासकीय धोरणांचा आणि लोकोपयोगी कार्यांचा अभ्यास केल्यास हे स्पष्ट होते की, त्यांनी एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच अशा एका समाजाची पायाभरणी केली होती जो ज्ञानाधिष्ठित, आरोग्यसंपन्न आणि सामाजिकदृष्ट्या सर्वसमावेशक होता. त्यांचे कार्य हे भारतीय ज्ञान परंपरा आणि आधुनिक युरोपीय

वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा एक अपूर्व संगम आहे. शाश्वत समाज निर्मितीमध्ये सरफोजी राजे (दुसरे) यांचे योगदान बहुआयामी आणि अफाट आहे. त्यांच्या कार्याचे विस्तृत विवेचन खालील महत्त्वाच्या मुद्द्यांच्या आधारे केले आहे.

**१. प्रशासकीय सुशासनाची धोरणे -**

सरफोजी राजांनी तंजावरचा कारभार स्वीकारल्यानंतर सर्वात पहिले महत्त्वाचे काम केले ते म्हणजे प्रशासनात सुसूत्रता आणि पारदर्शकता आणणे. शाश्वत समाजासाठी एक स्थिर आणि उत्तरदायी प्रशासन असणे ही प्राथमिक गरज असते. त्यांनी राज्याचे पाच जिल्ह्यांत विभाजन केले आणि प्रत्येक जिल्ह्याची जबाबदारी एका सुभेदाराकडे सोपवली होती. प्रशासकीय सोयीसाठी केलेले हे विभाजन सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे एक उत्कृष्ट उदाहरण होते. प्रशासकीय पारदर्शकता वाढवण्यासाठी त्यांनी आपल्या कार्यकाळात प्रथमच दरबाराच्या कामकाजाच्या सर्व नोंदी कागदावर ठेवण्यास सुरुवात केली. यामुळे कारभारात स्पष्टता आली आणि भ्रष्टाचाराला आळा बसण्यास मदत झाली. त्यांनी आपल्या राज्यकारभारात मदतीसाठी सहा अत्यंत विद्वान आणि अनुभवी व्यक्तींचे एक सल्लागार मंडळ स्थापन केले होते, ज्यातील अनेक सदस्य पुढे जिल्ह्यांचे प्रशासकीय प्रमुख म्हणून कार्यरत झाले. न्यायदान व्यवस्थेत त्यांनी स्मृती ग्रंथांच्या आधारे ***'व्यवहार प्रकाश'*** नावाचा एक सर्वसमावेशक कायदा संग्रह तयार केला, ज्यामुळे सर्वांना समान आणि जलद न्याय मिळण्याची खात्री निर्माण झाली. महसूल धोरणामध्ये त्यांनी शेती जमिनीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा लोककल्याणासाठी खर्च केला, ज्यामुळे राज्याची अर्थव्यवस्था स्थिर आणि सुबत्तापूर्ण झाली.

**२. आरोग्य विज्ञानातील क्रांती -**

सरफोजी राजांनी वैद्यकीय क्षेत्रात केलेले कार्य हे जागतिक इतिहासात अद्भूत मानले जाते. शाश्वत समाजाचा एक मुख्य आधार म्हणजे आरोग्यसंपन्न नागरिक. त्यांनी स्थापन केलेले धन्वंतरी महाल हे रुग्णालय एक जागतिक दर्जाचे संशोधन केंद्र होते. येथे त्यांनी विविध वैद्यकीय प्रणालींच्या समन्वयाचा यशस्वी प्रयोग केला. धन्वंतरी महालात आयुर्वेद, युनानी, सिद्ध आणि पाश्चात्य वैद्यकशास्त्राचे तज्ज्ञ एकत्र येऊन संशोधन करत असत. सरफोजी राजांच्या या आरोग्य धोरणांची व्याप्ती मोठी होती. त्यांनी नेत्रचिकित्सेत विशेष नैपुण्य मिळवले होते आणि ते स्वतः मोतिबिंदूच्या शस्त्रक्रिया करत असत. त्यांनी ४४ रुग्णांचे अत्यंत तपशीलवार रुग्ण-तक्ता तयार केले होते, ज्यात रुग्णाचे नाव, वय, आजाराची लक्षणे आणि उपचारांची माहिती दिली होती. यातील ३८ नोंदी इंग्रजी भाषेत तर ६ मोडी लिपीत आहेत. त्यांनी औषधी वनस्पतींच्या अभ्यासासाठी स्वतंत्र उद्याने विकसित केली आणि औषधी गुणधर्मांची शास्त्रीय चित्रे काढून घेतली होती. त्यांनी प्राण्यांच्या आरोग्यासाठी स्वतंत्र पशुवैद्यकीय दवाखाने आणि संशोधन विभागही सुरू केला होता, जो शाश्वत आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

**३. सामाजिक प्रबोधन -**

शिक्षण हा समाजाच्या शाश्वत प्रगतीचा पाया आहे, हे सरफोजी राजांनी ओळखून त्यामध्ये क्रांतिकारी बदल केले. पारंपारिक भारतीय शिक्षण पद्धतीला आधुनिक विज्ञानाची जोड दिली. त्यांनी स्थापन केलेली **'नवविद्या कलानिधी शाळा'** हे आधुनिक शिक्षणाचे एक केंद्र होते; जिथे भाषा, साहित्य, विज्ञान आणि कला यांसारखे विषय शिकवले जात असत. सरफोजी राजांनी शिक्षणाचे लोकशाहीकरण करण्यावर भर दिला. त्यांनी गरीब आणि अनाथ मुलांच्या शिक्षणासाठी विशेष सोय केली. त्यांना मोफत निवास व भोजन उपलब्ध करून दिले होते. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला जेव्हा स्त्रियांचे शिक्षण दुर्मिळ होते, तेव्हा सरफोजी राजांनी मुलींसाठी शाळा उघडल्या. तेथे महिला शिक्षिकांची नियुक्ती करून एक सामाजिक क्रांती घडवून आणली. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवासाठी त्यांनी आपल्या संग्रहातील हवा पंप, विद्युत यंत्रे, दुर्बिणी आणि मानवी सांगाडा यांसारखी आधुनिक शास्त्रीय उपकरणे उपलब्ध करून दिली होती. त्यांनी तामिळ शिक्षणासोबतच बहुभाषिकतेला प्राधान्य दिले, ज्यामुळे तंजावर हे प्रबोधनाचे केंद्र बनले.

**४. मुद्रणकलेचा विकास -**

कोणत्याही समाजाची शाश्वत प्रगती ही त्याच्या ज्ञानाच्या साठवणुकीवर आणि प्रसारावर अवलंबून असते. सरफोजी राजांनी सरस्वती महाल ग्रंथालयाचे पुनरुज्जीवन करून जगाला ज्ञानाचा एक अमूल्य ठेवा दिला. हे ग्रंथालय मध्ययुगीन काळातील एक वैभवशाली वारसा आहे जो त्यांनी अत्यंत कष्टाने वृद्धिंगत केला. सरस्वती महाल ग्रंथालयात सरफोजी राजांनी जगभरातून गोळा केलेली

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-5(A)| May-2026

४००० हून अधिक दुर्मिळ युरोपीय पुस्तके आणि हजारो भारतीय हस्तलिखिते जतन केली आहेत. त्यांनी या ग्रंथांचे विषयानुसार आणि वर्णानुक्रमे शास्त्रीय वर्गीकरण करण्यासाठी २७ स्वतंत्र विषय-शीर्षके तयार केली होती, जी भारतातील ग्रंथालय विज्ञानाची पायाभरणी मानली जाते. या संग्रहात वेदान्त, व्याकरण, संगीत, खगोलशास्त्र आणि वैद्यकशास्त्र यांसारख्या विविध विषयांचा समावेश आहे. तसेच येथे १६९२ सालापासूनचे जुने जगाचे नकाशे आणि भौगोलिक चित्रे संग्रहित आहेत. ज्ञानाच्या प्रसारासाठी सरफोजी राजांनी १८०५ मध्ये दक्षिण भारतातील पहिला देवनागरी छापखाना स्थापन केला, ज्याला '***नवविद्या कलानिधी वर्ण यंत्रशाळा***' असे नाव देण्यात आले होते. या छापखान्याच्या माध्यमातून त्यांनी अनेक दुर्मिळ ग्रंथ छापून ते सामान्य जनतेसाठी उपलब्ध करून दिले.

**५. पायाभूत सुविधा -**

शाश्वत नागरी जीवनासाठी प्रगत पायाभूत सुविधा आणि नैसर्गिक संसाधनांचे नियोजन अत्यंत महत्त्वाचे असते. सरफोजी राजांनी तंजावर शहराला आधुनिक रूप देण्यासाठी अनेक अभियांत्रिकी प्रकल्प राबवले. त्यांचे नागरी नियोजन हे त्या काळातील अत्यंत प्रगत नियोजनांपैकी एक मानले जाते. त्यांनी जलव्यवस्थापनासाठी शहरात १० मोठे तलाव आणि असंख्य विहिरी बांधल्या होत्या, ज्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीसाठी पाण्याचा शाश्वत पुरवठा होत असे. सार्वजनिक स्वच्छता आणि नागरी आरोग्य राखण्यासाठी त्यांनी संपूर्ण तंजावर शहरासाठी भुयारी सांडपाणी व्यवस्था राबवली होती, जी आजही आधुनिक नागरी नियोजनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. दळणवळण आणि व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी तंजावरपासून ५० किलोमीटर अंतरावर असलेल्या मनोरा येथे जहाज बांधणी केंद्र आणि हवामान वेधशाळा स्थापन केली होती. त्यांनी बांधलेली भव्य छत्रम (धर्मशाळा / विश्रामगृहे) ही केवळ प्रवाशांसाठी नव्हती, तर ती शिक्षण आणि आरोग्याची केंद्रे म्हणूनही कार्यरत होती.

**६. सांस्कृतिक ठेवा -**

शाश्वत समाज हा फक्त भौतिक प्रगतीने बनत नाही, तर तो सामाजिक न्यायावर आणि सांस्कृतिक मूल्यांवर आधारित असतो. सरफोजी राजांच्या प्रशासनात सर्व धर्मीयांना आणि जातींना समान स्थान होते. त्यांची धार्मिक सहिष्णुता हा एक आदर्श वस्तुपाठ आहे, ज्यामध्ये त्यांनी ख्रिश्चन मिशनरी शाळांना आणि नागोर दर्ग्यासारख्या मुस्लिम धार्मिक स्थळांना सढळ हाताने मदत केली. त्यांनी अनाथ मुलांच्या संगोपनासाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठी विशेष योजना आखल्या होत्या. छत्रममध्ये येणाऱ्या गरोदर महिलांची काळजी घेण्यासाठी आणि बाळंतपणानंतर त्यांना तीन महिने तिथेच राहण्याची परवानगी देऊन त्यांनी महिलांच्या कल्याणाचे एक मोठे पाऊल उचलले होते. सांस्कृतिक क्षेत्रात त्यांनी भरतनाट्यम आणि कर्नाटक संगीत या कलांना राजाश्रय दिला. त्यांनी दरबारात व्हायोलिन आणि क्लॅरिनेट यांसारख्या पाश्चात्य वाद्यांचा समावेश करून भारतीय संगीतात एक नवीन प्रयोग केला. त्यांनी बृहदेश्वर मंदिराच्या भिंतीवर भोसले वंशाचा इतिहास शिलालेखाच्या स्वरूपात कोरून घेतला, जो जगातील सर्वात मोठ्या शिलालेखांपैकी एक मानला जातो. हा ऐतिहासिक माहिती जतन करण्याचा एक शाश्वत मार्ग ठरला आहे.

**निष्कर्ष -**

शाश्वत समाज निर्मितीमध्ये सरफोजी राजे (दुसरे) यांचे योगदान केवळ ऐतिहासिक नोंदींपुरते मर्यादित नसून ते आजही तितकेच सुसंगत आहे. त्यांनी आपल्या प्रशासनातून हे सिद्ध केले की, मर्यादित संसाधनांमध्येही दूरदृष्टी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन असेल तर एक आदर्श समाज उभा करता येतो. आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि संस्कृती या चारही आघाड्यांवर सरफोजी राजांनी केलेले कार्य हे आजच्या शाश्वत विकास ध्येयांचे प्रतिबिंब आहे.

सरफोजी राजांनी धन्वंतरी महालाच्या माध्यमातून प्रगत आणि स्वस्त वैद्यकीय सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवली. ग्रंथालय आणि छापखान्यामुळे ज्ञान मर्यादित घटकांसाठी न राहता सर्वांसाठी उपलब्ध झाले. महिला शिक्षण आणि अनाथ मुलांच्या संगोपनामुळे समाजातील विषमता कमी होण्यास मदत झाली. जलव्यवस्थापन आणि स्वच्छता धोरणांमुळे मानवी जीवनाचा दर्जा उंचावला. कला आणि साहित्याला राजाश्रय मिळाल्यामुळे भारतीय संस्कृतीचा हा वारसा भविष्यातील पिढ्यांसाठी जतन झाला.

सरफोजी राजांनी तंजावरमध्ये जे प्रबोधन घडवून आणले, ते त्या काळापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी निर्माण केलेली सरस्वती महाल ग्रंथालयासारखी संस्था आजही जागतिक स्तरावर संशोधनाचे केंद्र म्हणून कार्यरत आहे. त्यांच्या या लोकोपयोगी कार्याचा आणि

प्रशासकीय धोरणांचा अभ्यास केल्यास आपल्याला एक समृद्ध आणि शाश्वत भविष्य घडवण्यासाठी लागणारी प्रेरणा आणि दिशा दोन्ही मिळतात.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

1. Biswas, J., Badrinath, V., & Badrinath, S. S. (2012) - Ophthalmic contributions of Raja Serfoji II (1798–1832), Indian Journal of Ophthalmology, 60(4), 297–300.
2. Nair, S. P. (2005) - Native collecting and natural knowledge (1798–1832): Raja Serfoji II of Tanjore as 'Centre of Calculation', Journal of the Royal Asiatic Society, 15(3), 279–302.
3. Nair, S. P. (2012) - Raja Serfoji II: Science, medicine and enlightenment in Tanjore, Routledge. ISBN: 978-0-415-53504-5.
4. Perumal, P. (2014) - The Sarasvati Mahal Library and contribution of Rajah Serfoji II, Thanjavur Maharaja Serfoji's Sarasvati Mahal Library and Research Centre.
5. Shanlax International Journal of Arts, Science & Humanities. (2016) - Life and reign of Maharaja Serfoji II. 3(3), 28-31. ISSN: 2321 – 788X.
6. Sinh, P. S. S. R. B. (2020) - Contributions of Thanjavur Maratha Kings (2nd ed.), Serfoji Memorial Hall.
7. Venkataramaiya, K. M. (1984) - Administration and social life under the Maratha rulers of Thanjavur, Tamil University.